पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर
नविन प्रशासकिय इमारत संकुल, प्लॉट नं. १, सेक्टर – १५
मोरेकुरण रोड, कोळगाव, नवनगर, ता. जि. पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

प्रेसनोट क्र. ४७ दिनांक ०६/०६/२०२६

पालघर जिल्हा पोलीस दला तर्फे वाहन चालकांची मोफत नेत्र तपासणी शिबीर

पालघर जिल्हा मा.पोलीस अधीक्षक सो, पालघर श्री.यतीश देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतुक शाखेतर्फे दिनांक ०६/०६/२०२६ रोजी राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ मुंबई - अहमदाबाद महामार्गावर कासा टोलनाका येथे वाहन चालक व स्थानिक नागरीकांकरीता मोफत नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

सदर शिबीरासाठी इंन्फीगो आय केअर सेंटर हॉस्पीटल, पालघर येथील तज्ञ डॉक्टरांची उपस्थीती लाभली. शिबीरात डॉ. श्रीमती भक्ती गाढे, डॉ. श्रीमती सुष्मीता पाटील व डॉ श्री.कल्पेश भोईर असे तज्ञ डॉक्टरांनी सहभाग नोंदवून नेत्र तपासणीचे कार्य पार पाडले.

सदर शिबीरामध्ये वाहन चालक व स्थानिक नागरीक असे एकुण ५५७ ईसमांची नेत्र तपासणी करण्यात आली. तसेच तपासणी दरम्यान चष्मा लावणे आवश्यक असल्याचे आढळून आलेल्या नागरिकांना योग्य नंबरच्या चष्म्यांचे मोफत वाटप करण्यात आले. सदरवेळी ज्या वाहनांना रिफ्लेक्टर नव्हते अशा वाहनांना मोफत रिफ्लेक्टर लावण्यात आलेले आहेत. या उपक्रमास वाहन चालक व स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सर्व नागरिकांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून पोलीस विभागास सहकार्य करावे, असे श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर यांचेकडून आवाहन करण्यात येत आहे. मा. पोलीस अधीक्षक, श्री.यतिश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. अनिल व्हटकर, सहाय्यक पालीस निरीक्षक जिल्हा वाहतुक शाखा व त्यांचे अधिनस्त अंमलदार यांनी सुयोग्य नियोजन करुन नेत्र तपासणी शिबीर कार्यक्रम संपन्न केला आहे.